॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२३–२४/५२५ दिनांक १२/०१/२०२४

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: महाविद्यालयीन युवक–युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये "कौशल्य विकास केंद्र" स्थापन करणे बाबत.

संदर्भ: श्रीमती निधी चौधरी I.A.S., आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार, आणि उद्योजगता व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचा दिनांक ११/०१/२०२४ रोजीचा ई–मेल.

महोदय,

उपरोक्त विषयी श्रीमती निधी चौधरी I.A.S., आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार, आणि उद्योजगता व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांनी संदर्भिय पत्रान्वये केंद्र शासनाने रोजगाराबाबत बदलत्या राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने माहे जानेवारी २०१५ मध्ये स्वतंत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाची स्थापना केली आहे.

बेरोजगार उमेदवारांना विविधि क्षेत्रांमधील रोजगार उपलब्ध करून देणे, स्वंयरोजगार करू इच्छिणा–या उमेदवारांना अर्थ सहाय्य प्रदान करणे, कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगारक्षम बनविणे ही सध्याच्या काळाची गरज पुर्ण करण्याच्या हेतूने राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनातील विविध विभागांतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षणाशी निगडीत सर्व योजना व कार्यक्रमांखाली निधीची सांगड घालून एकात्मिक अंमलबजावणीद्वारे कार्यप्रवण वयोगटातील (१५ ते ४५ वर्षापर्यंतच्या वयोगटातील) उमेदवारांचे अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक कौशल्य विकास (Skill Development) कौशल्य वर्धन (Up-Skilling) पुनर्कौशल्य विकास (ReSkilling) करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत केंद्र, राज्य व जिल्हा पुरस्कृत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांच्या माध्यमातून राज्यातील १५ ते ४५ वयोगटातील युवक–युवतींना विविध ३७ क्षेत्रामध्ये (बॅकिंग, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, ईलेक्ट्रॉनिक्स इ.) कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवून रोजगार अथवा स्वयंरोजगाराच्या संधी पुरविण्यात येतात.

National Skills Qualification Framework (NSQF)अन्वये स्थापित मानांकानुसार १२०० पेक्षा अधिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचे संबधित प्रशिक्षण संस्थामार्फत उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत असून सदर कौशल्य प्रशिक्षण NCrF प्रणालीशी संबधित आहे. प्रशिक्षणाअंती उमेदवारांचे मूल्यमापन (Assessment) आणि प्रमाणीकरण (Certification) हे केंद्र शासनाच्याा National Council for Vocational Education Training-NCVET, National Skill Development Corporation-NSDC आणि Sector Skill Councils(SSC) कडील मान्यताप्राप्त मूल्यमापन संस्था (Assessing Body)मार्फत करण्यात येते. सदर प्रमाणपत्र राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त असून हया अभ्यासक्रमांमध्ये Vertical व Horizantal Mobility अंतभूर्त आहे.

आपल्या महाविद्यालयात कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करून १५ ते ४५ वयोगटातील युवक—युवतींना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करून त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. राज्य शासनामार्फत कौशल्य प्रशिक्षण घेऊ इच्छिणा—या उमेदवारांना नि:शुल्क स्वरूपात प्रदान करण्यात येईल. या करीता केंद्र शासनामार्फत निश्चित केलेल्या Common Cost Norms नुसार कौशल्य विकास केंद्रांना विविध टप्प्यांमध्ये सरासरी रू. १५०००/— पर्यंत प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येते.

राज्यातील १०० नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याच्या राज्य शासनाचा मनोदय आहे. या करीता गुगल फॉर्म लिंक तयार करण्यात आली असून त्याद्वारे आपल्या महाविद्यालयामध्ये "कौशल्य विकास केंद्र" स्थापन करण्यासाठी दिनांक २६ जानेवारी २०२४ पर्यंत अर्ज करावयाचा आहे.[Google form link: https://forms.gle/kS13TCXw7LbeaC3n8]

त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात "कौशल्य विकास केंद्र" स्थापन करण्यासाठी दिनांक २६ जानेवारी २०२४ पर्यंत गुगल फॉर्म लिंक .[Google form link: https://forms.gle/kS13TCXw7LbeaC3n8] वरील आवश्यक ती माहिती विहित मुद्दतीत भरण्यात यावी, ही विनंती.

**डॉ. मल्लिकार्जुन करजगी**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.